# महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था,मआविवि, नाशिक

MAHARASHTRA POST GRADUATE INSTITUTE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH MUHS, NASHIK

दिंडोरीरोड, म्हसरुळ, नाशिक- ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik – 422004
Tel : (0253) 2539292, 2539294 Website: www.muhs.ac.in

MUHS

डॉ.मृणाल पाटील
एम.बी.बी.एस., एम.डी.(नेत्र चिकित्सक)
अधिष्ठाता

Dr. Mrunal Patil
M.B.B.S. MD (Ophthalmology)
Dean


जा.क्र.मआविवि/एमपीजीआय/ ११४८/२०२५ दि.22/०९/२०२५

प्रति,

........................

........................

........................

**दरपत्रक सुचना क्र.: १३ /एमपीजीआय/२०२५-२६**

**विषय :-** महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, मआविवि, नाशिक करीता प्रिंटर उपकरण खरेदी करण्याकरीता दरपत्रके मागविणे बाबत...

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था,मआविवि, नाशिक येथील विविध विभागांकरीता विविध उपयोगी प्रिंटर (Multy Fuctioning Priter) (प्रिंटींग, स्कॅनिंग, फोटोकॉपी इ. सुविधा) हे उपकरणे खरेदी करणे प्रस्तावित आहे. विविध उपयोगी प्रिंटर (Multy Fuctioning Priter) या उपकरणची आवश्यक संख्या व तांत्रिक तपशिल इत्यादी माहिती **"सहपत्र – अ"** प्रमाणे सोबत जोडण्यात आली असून नमुद केलेल्या तांत्रिक तपशिलाप्रमाणे विविध उपयोगी प्रिंटर या उपकरणांसाठी विविध अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

करीता, विनंती करण्यात येते की **"अधिष्ठाता, महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था,मआविवि, नाशिक"** यांचे नावाने दि.३०/०९/२०२५ रोजी सायंकाळी ४.०० पर्यत पावेतो सिलबंद दरपत्रके (तांत्रिक लिफाफा व व्यापारी लिफाफा इ. दरपत्रके एका स्वतंत्र पाकीटात टाकून) पाठवावीत. दरपत्रकाच्या लिफाफ्यावर **"एमपीजीआय करीता विविध उपयोगी प्रिंटर साठीचे दरपत्रक"** **(Quotation)** असे नमुद करण्यात यावे. सदर दरपत्रके खरेदी समितीद्वारे उघडण्यात येतील.

**दरपत्रकात नमुद केलेले दर हे व सर्व करांसह (GST) व वाहतूकीसह नमुद केलेल्या ठिकाणी / म.प.वै.शि.सं.सं., म.आ.वि.वि., नाशिक, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, अनंत कान्हेरे मैदानासमोर, त्र्यंबकरोड, नाशिक येथे उपकरणे व साहित्य पोहोच करण्याचे व**

(कृ.मा.प.)

कार्यन्वित करण्याचे असावेत. दरपत्रकावर आपला जीएसटी क्रमांक व दिनांक नमुद करण्यात यावा.

**दरपत्रकाच्या अटी व शर्ती :-**

१. एका अधिकृत पुरवठेदार व्यक्तीने/फर्मने एकच दरपत्रक सादर करावे. वेगवेगळया फर्मच्या नावाने एकाच पुरवठेदाराने दरपत्रके सादर करु नये.

२. दरपत्रक **"अधिष्ठाता, महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था,मआविवि, नाशिक"** यांचे नावाने सादर करावे, तसेच त्यावर **"एमपीजीआय करीता विविध उपयोगी प्रिंटर साठीचे दरपत्रक" (Quotation)** असे स्पष्ट नमुद करण्यात यावे.

३. दरपत्रकासोबत पुरवठेदाराने स्वत:चे किंवा फर्मचे पॅनकार्ड, आधारकार्ड, शॉपॲक्ट परवाना, संगणक/सगणकीय उपकरणे/साहित्य पुरवठा करण्याचा (राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थेचा परवाना इ.) परवाना (असल्यास), उपकरणे/साहित्यांचे कंपनीचे अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र/परवाना इ. दरपत्रकासोबत सादर करावे.

४. पुरवठेदाराने दरपत्रकात प्रिंटर चे सादर केलेले दर सर्व करांसह, "महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था,मआविवि, नाशिक जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, अनंत कान्हेरे मैदानासमोर, त्र्यंबकरोड, नाशिक" येथे पोहच करण्याचे व प्रात्यक्षिकासह (Demonstration) कार्यन्वित करण्याचे असावेत. पुरवठेदाराने आपल्या दरपत्रकात वाहतूक खर्च, सेवा खर्च व इतर कोणताही खर्च स्वतंत्रपणे नमुद करु नये.

५. पुरवठेदाराने शासकीय/निमशासकीय कार्यालय, इतर प्रतिष्ठीत संस्थेस प्रिंटर/उपकरणे/साहित्य पुरवठा केल्याचा किमान ५ वर्षाचा अनुभाव असणे आवश्यक आहे. पुराव्यासाठी पुरवठा आदेशाची (Purchase Order) प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. प्रिंटरचे निर्धारीत तांत्रिक तपशिलहून अधिक दर्जा/क्षमतेचे प्रिंटर/ उपकरणाचे दर सादर करता येतील. संस्थेला स्पर्धात्मक दरात अधिक क्षमतेचा उपकरण प्राप्त होत असल्यास त्याचा विचार करण्याचा अधिकार संस्था राखुन ठेवत आहे. मात्र ते स्विकारणे संस्थेवर बंधन कारक असणार नाही.

७. पुरवठेदाराने दरपत्रकात/सोबत स्वत:च्या कोणत्याही अटी व शर्ती नमुद करु नये.

८. पुरवठादाराने दरपत्रकात नमुद केलेले उपकरणे / साहित्य नविन, सिलपॅक, न वापरलेले व प्रमाणित केलेले असावे. (आवश्यक असल्यास)

९. पुरवठेदाराने पुरवठा केलेले उपकरणे / साहित्य कार्यन्वित केल्यानंतर तांत्रिक समितीमार्फत तपासणी/परिक्षण करण्यात येईल. दरपत्रकातील यादीप्रमाणे व तांत्रिक तपशिलाप्रमाणे नसलेले उपकरणे व साहित्य स्विकारण्यात येणार नाहीत.

१०. पुरवठा करण्यात येणारे उपकरणे व साहित्यांची WARRANTY / GUARRANTY नमुद करावी. तसेच, उपकरणाचे दर हे ३ वर्षाच्या ACMC सह आणि ACMC विरहीत असे दोन्ही दर नमुद करावेत. उपकरणाचा Break dawn कालावधी नमुद करावा.

११. दरपत्रकातील नमुद उपकरणे व साहित्यांची प्रति वर्ष ACMC चे दर / रक्कम नमुद करावी. ACMC घेणे संस्थेस बंधनकारक असणार नाही.

१२. पुरवठेदार प्रिंटर ज्या उत्पादकाचा पुरविणार असेल त्या उत्पादकाचे नाशिक शहरात सर्विस सेंटर असणे आवश्यक आहे. अधिकृत सर्विस सेंटर नाशिक शहरात असल्याचा पुरावा दरपत्रकासोबत (तांत्रिक लिफाफयात) जोडणे आवश्यक आहे.

१३. सदर दरपत्रक प्रक्रियेत न्युनतम दरपत्रक स्विकारणे संस्थेस बंधनकारक असणार नाही.

१४. सदर उपकरणे पुरवठयाकरीता पुरवठेदारास कोणताही प्रकारचा अग्रिम अथवा अगावू रक्कम अदा करण्यात येणार नाही. पुरवठयाची कार्यवाही व कार्यन्वित झाल्यानंतर देयकाची अदायगीची कार्यवाही करण्यात येईल.

१५. पुरवठा आदेशाप्रमाणे उपकरणे / साहित्यांचा पुरवठा पुर्ण झाल्यानंतर व उपकरणे कार्यन्वित झाल्यानंतर मुळ देयक सादर करावे. तांत्रिक समितीने पुरवठा आदेशाप्रमाणे व कार्यन्वित केल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयक अदायगीची कार्यवाही करण्यात येईल.

१६. पुरवठयाच्या देयकाची अदायगी बॅक खात्यात RTGS/NEFT किंवा धनादेशाद्वारे करण्यात येईल. करीता, पुरवठेदाराने देयकासोबत आपल्या बॅक खात्याचा तपशिल सादर करावा.

१७. वित्तीय नियमांप्रमाणे रु.३०,०००/- वरील देयकावर २ टक्के सेवा कर (T.D.S.) आकारण्यात येईल. तसेच, रु.२,५०,०००/- वरील देयकावर २ टक्के सेवा कर (T.D.S.) व २ टक्के आयकर आकारण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१८. कोणतेही कारण न देता दरपत्रकात बदल करण्याचा, दरपत्रक रदद्‌करण्याचा अधिकार संस्था/विद्यापीठ राखुन ठेवत आहे.

१९. दरपत्रकाबाबत न्यायालयीन बाब उद्‌भवल्यास ती नाशिक कार्यकक्षे अंतर्गत येईल.

अधिष्ठाता
Dean
Maharashtra Post Graduate Institute of
Medical Education & Research MUHS Nashik

| अ. क्र. | उपकरणांचे नाव व तांत्रिक तपशिल | | संख्या | दर | GST % | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | Multy Functioning Printer Technical Specification | | | | | |
| | Copy Funtion | | | | | |
| 1 | Memory capacity | 1 GB | 12 | | | |
| 2 | CPU | Cortex A53 1.2 GHz Dual core | | | | |
| 3 | Scan Resolution | 600 x 600 dpi | | | | |
| 4 | Print resolution | 1200 x 600 dpi | | | | |
| 5 | Paper size | Max : A4, Letter, Legal | | | | |
| 6 | Paper tray Capacity | 250 sheets + bypass tray 100 sheets | | | | |
| 7 | Output tray Capacity | 150 sheets | | | | |
| 8 | Power Supply | AC 220-240 V 50/60Hz | | | | |
| | Print Function | | | | | |
| 9 | Print Resolution | 300 x300 dpi, 600 x 600 dpi, 2400 x 600 dpi, 1200 x 1200 dpi<br>PPM- 46 | | | | |
| 10 | Supporting OS | Windows 11 | | | | |
| 11 | Interface Standard | Ethernet, 10/100/1000<br>USB 2.0 or 3.0<br>Wireless LAN | | | | |
| | Scan Function | | | | | |
| 12 | Scan Resolution | 1200 x 600 dpi, 600 x 600 dpi | | | | |
| 13 | Interface | Ethernet, 10/100/1000<br>USB 2.0 or 3.0<br>Wireless LAN | | | | |
| | Automatic Document Feeder | | | | | |
| 14 | Type | 1 pass, 2 sided scanning Automatic document feeder | | | | |
| 15 | Original Size | Max : Legal, Min : A6 | | | | |
| 16 | Capacity | 50 sheets or More | | | | |
| 17 | Scan Speed | BW : 28 ppm, Color : 20 ppm<br>1 pass, 2 sided scanning, BW :56 ppm, color: 40 ppm<br>(Standard document A4, 300 dpi to pc) | | | | |
| 18 | Warranty | 3 Years | | | | |
| | Total- | | | | | |

अधिष्ठाता
Dean
Maharashtra Post Graduate Institute of Medical Education & Research MUHS Nashik